Historicity Research Journal
ISSN : 2393-8900
Impact Factor : 1.9152 (UIF)
Volume - 3 | Issue - 11 | July – 2017

# प्राचीन भारतातील स्त्री कामगारांचा अभ्यास

**प्रा.डॉ.सौ. स्वाती रा. सरोदे**
**वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड, जि.सातारा-**



## प्रास्ताविक

भारतीय समाजात सभ्यता व संस्कृतीचा केंद्रबिंदू म्हणून स्त्रीकडे पाहिले जाते. स्त्रीवादी संकल्पनेनुसार स्त्रीचे समाजातील स्थान हे अनेक आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय व सांस्कृतिक बाबींवर अवलंबून असते. तिचा दर्जा व्यवस्था, परिस्थिती आणि समाजमान्य नीतिमूल्यांवरही अवलंबून असतो. प्राचीन भारतीय इतिहासातील उच्चवर्णीय स्त्रियांचा अभ्यास केला गेला आहे. परंतु तत्कालीन आर्थिक क्षेत्रातील स्त्री कामगारांचा फारसा विचार झालेला दिसत नाही. यातील बहुतेक स्त्रिया खालच्या वर्गातील असल्या तरी त्या एकंदर स्त्री जीवनाचे अभिन्न अंग होत्या व आहेत. History from below म्हणजे सामान्यातल्या सामान्य माणसालाही इतिहास लेखनप्रक्रियेत स्थान देण्याची इतिहास संशोधकांची भूमिका आहे. समाजातील उपेक्षित कनिष्ठ दर्जाच्या व्यक्तींचा इतिहास जाणून तो शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न 'सबाल्टर्न स्टडीज' या इतिहास लेखनप्रवाहात केला जातो. सदर शोधनिबंधात प्राचीन भारतातील स्त्री कामगारांच्या जीवनाच्या बऱ्याच प्रमाणात अज्ञात असलेल्या भागावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

## उद्दिष्टे

१) प्राचीन भारतातील स्त्री कामगारांच्या कार्यक्षेत्रांचा अभ्यास करणे.
२) स्त्री कामगारांच्या बाबतीत तत्कालीन प्रशासकीय दृष्टिकोन अभ्यासणे.

सदर शोधनिबंधासाठी वेदकाळापासून ते गुप्तकाळापर्यंतचा ऐतिहासिक कालखंड विचारात घेतला आहे. तसेच वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

## विषय विवेचन

भारतात आर्य संस्कृती स्थिरावल्यानंतर कुटुंब व्यवस्था, वर्णव्यवस्था, जातीसंस्था अशा सामाजिक संस्था उदयास येऊन उत्तरोत्तर त्या अधिक दृढमूल होत गेल्या. या संस्थांनी तत्कालिन मानवी जीवनाची राजकीय, सामाजिक, आर्थिक अंगे व्यापून टाकली. वैदिक वाड्.मयातून प्राचीन वर्णव्यवस्था, जातिप्रथा व समाजव्यवस्थेची माहिती मिळते. वेदकालीन चातुर्वर्ण्यव्यवस्था नंतरच्या काळात व्यवसायांतील वाढ व परकीय आक्रमणे यांमुळे जातीव्यवस्थेत परिवर्तीत झाली. आर्यांमधील विविध व्यवसाय करणारे जे वैश्य अनार्य शूद्रांच्या सहवासात आले त्यांनाही शुद्र मानले जाऊ लागले. विविध व्यावसायिक, कारागीर व कलावंत अशा कामकरी वर्गाचा समावेश शूद्रवर्णात करण्यात आला.[१] दुसऱ्या नागरीकरणाच्या काळात खेड्यातील हस्तकारागीर व कामगार नगरांमध्ये स्थिरावल्याने नवीन उद्योग वाढीस लागले.गुप्तकाळापर्यंत व्यापारी, कामगार, कारागीर, शेतकरी, व्यवसायिक, दास, गणिका व संकर वर्णीयांचा मोठा वर्ग निर्माण होऊन नंतरच्या काळात वाढत गेला.[२] सुखवस्तू घरातील स्त्रियांचे कार्यक्षेत्र घरकाम हेच बनले. कारण

विवाहसंस्थेच्या उदयानंतर परपुरुषाचा धोका टाळण्याच्या व स्वबीजाचा पुत्र मिळवण्याच्या हेतूने क्षेत्रशुद्धीवर भर देण्याची प्रवृत्ती वाढीस लागली.[३] परंतु दुर्बल आर्थिक स्थितीतील स्त्रियांना आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी घराबाहेर पडणे अपरिहार्य ठरले.

## प्राचीन भारतातील स्त्री कामगारांची कार्यक्षेत्रे

### १) शेती व पशुपालन

**वेदकाळात वैश्य वर्णाचा मुख्य व्यवसाय शेती हाच असल्याने कुटुंबातील पुरुषांबरोबरच स्त्रियाही सहभागी होत. पेरणी, कापणी, निंदणी, खुरपणी अशी कमी जोखमीची कामे स्त्रियाच करत.४ याच काळात शूद्र वर्णातील स्त्रियाही कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी उच्चवर्णीयांच्या शेतावर कामे करीत. त्यांची गुरे चारायला नेत. शूद्र वर्णातील स्त्रिया पुरुष वर्गाच्या बरोबरीने शेती उत्पादनाच्या प्रक्रियेत सहभागी होत. इसवी सन पूर्व सहाव्या शतकात शेतीकामासाठी लोखंडी हत्यारांचा वापर सुरू झाला. त्यामुळे अतिरिक्त मनुष्यबळाची गरज कमी होऊन स्त्रियांना शेतीकामासाठी मजुरी मिळण्याचे प्रमाण कमी झाले. गुप्तोत्तर काळात जमिनदारी प्रथेच्या उदयानंतर जमीनदारांच्या शेतीवर स्त्रीया कधी रोजंदारीने तर कधी वेठबिगारीने राबत.**

### २) विविध व्यवसाय

अश्मयुगीन काळापासून भारतीय स्त्रियांनी आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी विविध व्यवसायांचा शोध लावला. उत्तरवैदिक काळात हस्तव्यवसाय व त्यांच्याशी संबंधित कारागिरांची संख्या वाढली. विणकाम, वस्त्रांना रंग देणे, त्यावर कशिदाकाम करणे अशा प्रकारची कामे प्रामुख्याने स्त्रियाच करीत.[५] धान्य भरडणे, टोपल्या विणणे, मातीची भांडी तयार करणे ही कामे प्रामुख्याने स्त्रियाच करीत. सोनारकाम, लाकूडकाम, दोर तयार करण्याच्या व्यवसायांमध्ये पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया सहभागी होत. या स्त्री कामगार वैश्य व शुद्र वर्णातील असत. मौर्य व मौर्योतर काळात विणकाम व सूतकताई या कामात काही प्रमाणात उच्च वर्गातील स्त्रिया सहभागी होत.विधवा, गरीब किंवा परित्यक्त्या स्त्रियांना आपला चरितार्थ चालविण्यासाठी अशी कामे करावी लागत.[६] बुद्धकाळात नागरीकरणाची प्रक्रिया वाढून उद्योग व्यवसायांतही वृद्धी झाली. त्यामुळे काही स्त्रिया वस्तूविक्रीच्या क्षेत्रांतही सहभागी होऊ लागल्या. त्या तेल, मध, औषधी वस्तू, मद्यार्क, लाकूड अशा वस्तू लोकांच्या दारोदारी विकत. अशा स्त्रिया उच्चवर्णीय स्त्रियांपेक्षा आर्थिकदृष्ट्या अधिक स्वावलंबी होत्या.

### ३) सेवा क्षेत्र

मौर्यकाळात नगरांमध्ये मोठ्या उद्योगांची वाढ झाल्याने ग्रामीण भागातील कारागीर नगरात स्थलांतरित होऊन श्रमजीवी मजूर म्हणून काम करू लागले. त्यातूनच दासप्रथेचा उदय झाला. पराभूत अनार्य, त्यांच्या स्त्रिया, मृत शत्रूंच्या स्त्रिया यांनाही उच्चवर्णीयांनी दासी म्हणुन आपल्या सेवेस जुंपले. अशा स्त्रियांना मालकांच्या घरी सर्व प्रकारची कामे करावी लागत. गुलाम पुरुषांच्या स्त्रिया आपल्या पतीबरोबर शेती व त्यांच्या इतर कामात सहभागी होत.[७] गुप्तोत्तर काळात जमीनदारी पद्धतीचा उदय झाल्यावर दासी प्रथेला ओहोटी लागली.

### ४) मनोरंजनाचे क्षेत्र

वेदकाळापासून ते गुप्तकाळापर्यंत नृत्य, गायन, वादन व देहविक्रयाच्या माध्यमातून समाजाचे मनोरंजन करणाऱ्या गणिकांचा वर्ग अस्तित्वात होता. राजाची व्यक्तिगत सेवा करणे व मनोरंजनाद्वारे त्याला खुश ठेवणे ही

गणिकांची महत्त्वाची जबाबदारी असे.[८] डोंबारी, जादुगार, दरवेशी, यासारखे लोकांच्या दारोदारी जाऊन खेळ करणारे कलाकार आपल्या कामांत आपल्या स्त्रियांनाही समाविष्ट करून घेत.

## प्रशासकीय दृष्टीकोण

मौर्यकाळात प्रत्येक गावातील स्त्री व पुरुष कारागिरांची नोंद शासनाकडून ठेवली जाई. कारागिरांचा कर हे शासनाच्या उत्पन्नाचे साधन असे.[९] वृद्ध गणिका, परीत्यक्त्या यांचा चरितार्थ चालावा म्हणून त्यांना सूतकताई,दाई अशी कामे दिली जात.[१०] कारागीर, कलाकार, शरीर संरक्षक,गुप्तहेर अशी कुशल व महत्त्वाची कामे करणाऱ्या स्त्रियांचे वेतन शेती व घरकाम अशी अकुशल स्वरूपाची कामे करणाऱ्या स्त्रियांपेक्षा तुलनेने जास्त असे. शासनाने केलेल्या नियमांचे पालन अधिकारी वर्गाकडून योग्य पद्धतीने होत नसे.

## समारोप

प्राचीन भारतातील निम्न वर्गातील स्त्रिया घरकामाबरोबरच शेती व विविध व्यवसायांमध्ये कार्यरत होत्या. त्यांचा सामाजिक दर्जा उच्च वर्गातील स्त्रियांपेक्षा खालचा असून उच्चवर्णीयांकडून त्यांना हीन वागणूक मिळे. धार्मिक क्षेत्रातही त्यांना सहभागी होण्याचे स्वातंत्र्य नव्हते.स्त्रियांचे अर्थार्जन ही कौटुंबिक व राष्ट्राच्या दृष्टीने आवश्यक व इष्ट बाब ठरते.सद्यस्थितीतही आर्थिक क्षेत्रात स्त्रियांना त्या कार्यरत असणाऱ्या विविध क्षेत्रांत दुय्यम स्थान आणि दर्जा दिला जातो. त्यांच्या श्रमाचे योग्य मोल होत नाही.

## निष्कर्ष

१) प्राचीन भारतातील वैश्य व शुद्र वर्णातील स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होत्या.

२) प्राचीन भारतातील स्त्री कामगार वर्गाचे शोषण उच्चवर्णीयांकडून होत असे. त्यांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळत नसे.

३) शासनाकडून स्त्री कामगारांच्या सुरक्षेसाठी कायदे झाले असले तरी त्यांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत नसे.

## संदर्भ ग्रंथ सूची

१) जोशी पी.जी., भारताचा सांस्कृतिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, २००३, पृष्ठ १९८

२) कित्ता, पृष्ठ 199

३) मून वसंत, बुद्धकालीन स्त्रीजीवन, सुगावा प्रकाशन, पुणे, १९८९, पृष्ठ ३५

४) थापर रोमिला (अनु. शिरगावकर शरावती), अशोक आणि मौर्यांचा इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८८, पृष्ठ ८७

५) जैन कैलाशचंद्र, प्राचीन भारतीय सामाजिक एवं आर्थिक संस्थाए,मध्यप्रदेश हिंदी ग्रंथ अकादमी, भोपाल,१९७१,पृ.२१०

६)Tyagi A.K., Women Workers in Ancient India, Radha Publications, New Delhi, 1994, Page No.03

७) खन्ना के. सी., त्यांनी पाहिलेला भारत, नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली, १९७०, पृष्ठ ९

८) Sur A.K., Sex and Marriage in India, Allied Publishers, New Delhi, 1973, Page No. 141

९) Pankaj N.Q., State and Religion in Ancient India, Chugh Publications, Allahabad, 1983, Page No 23

१०) पांथरी राघवेंद्र, प्राचीन भारत में सामाजिक परिवर्तन, वाणी प्रकाशन, नई दिल्ली,१९८७,पृ.८६